Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | शुक्रवार
२२.०५.२०२६

# वरुड दर्पण

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १११ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### भाजप १२, शिवसेना ३ तर राष्ट्रवादी २ जागांवर लढणार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** -राज्यातील आगामी विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला असून महायुतीचा जागावाटपाचा प्राथमिक फॉर्म्युला अखेर समोर आला आहे.

मिळालेल्या विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, ही निवडणूक भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) 'महायुती' म्हणूनच एकत्र लढणार असून, वरिष्ठ नेत्यांमध्ये यावर एकमत झाले आहे. प्राथमिक चर्चेनुसार, भाजप १२, शिवसेना ३ आणि राष्ट्रवादी काँग्रेस २ जागांच्या फॉर्म्युल्यावर निवडणूक लढवण्याची दाट शक्यता आहे.

## महाराष्ट्र नीट पेपरफुटीचे केंद्र, हायप्रोफाईल पालक रडारवर

### सीबीआयकडे हादरवणारे पुरावे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** - सीबीआयला महाराष्ट्र आणि राजस्थानमध्ये नीट पेपरच्या प्रिंट काढून विक्री केल्याचे पुरावे मिळाले आहेत.

त्यामुळे सीबीआयच्या म्हणण्यानुसार, यापुढील आरोपींना अटक झाल्यानंतर नीट पेपरलीक प्रकरण आणखी व्यापक वळण घेणार आहे. तसेच नीट पेपरफुटीचे महाराष्ट्र केंद्र म्हणून समोर आले असून या प्रकरणात हायप्रोफाईल पालक रडारवर असल्याची माहिती समोर येत आहे.

सीबीआयच्या तपासातून काही नातेवाईकांनी नीटचा पेपर पुढे इतर लोकांनाही




विकला होता, अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे.

मात्र अद्याप किती विद्यार्थ्यांनी पेपर खरेदी केला होता, हे सीबीआयला निश्चित करता आलेले नाही. यामुळेच पेपर किती लोकांपर्यंत पोहोचला, हे सध्या शोधणे कठीण झाले आहे. नीट पेपरलीकचे सर्वात मोठे केंद्र महाराष्ट्र सीबीआयच्या तपासात आतापर्यंत समोर आले आहे की, नीट पेपरलीकचे सर्वात मोठे केंद्र महाराष्ट्र होते. याच ठिकाणाहून राजस्थान आणि इतर राज्यांतील विद्यार्थ्यांपर्यंत 'प्रश्नपत्रिका' पोहोचवण्यात आली. पेपरलीक करणारे दलाल आणि सूत्रधारच नव्हे, तर मोठी रक्कम देऊन पेपर खरेदी करणारे हाय प्रोफाइल पालकही सीबीआयच्या रडारवर आहेत.

एजन्सी आता अशा सर्व पालकांची यादी तयार करत आहे, ज्यांच्या बँक खात्यांतून शिवराज मोटेगावकर, पी. व्ही. कुलकर्णी किंवा त्यांची सहकारी मनीषा वाघमारे (पुणे) यांच्या खात्यांमध्ये पैसे ट्रान्सफर झाले होते.

सीबीआयच्या तीन पथकांकडून आता पुढील चेन म्हणजे पेपर खरेदी करणारे नातेवाईक आणि विद्यार्थ्यांवर कारवाई करण्याची तयारी सुरू आहे. सीबीआय लवकरच इतर राज्यांमध्येही छापेमारी करणार आहे. लातूरमध्ये सीबीआयची कारवाई आणखी तीव्र, तिसऱ्या डॉक्टरची चौकशी सुरू लातूर शहरात नीट पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाला आता आणखी वेग आला असून, सीबीआयचे पथक आता तिसऱ्या डॉक्टरांच्या चौकशीसाठी दाखल झाले आहे.

## कपडे खरेदीसाठी निघाले अन वाटेतच घात झाला! पती, पत्नीसह चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वर्धा** - नागपूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरील हिंगणघाट नजीक आज भीषण अपघात घडला आहे. महामार्गावरील हॉटेल सगुना फॅक्टरीजवळ भरधाव येणाऱ्या एका अज्ञात वाहनाने मोपेड दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत एकाच कुटुंबातील तिघांचा जागीच अंत झाला. मृतांमध्ये पती, पत्नी आणि त्यांच्या अवघ्या ६ वर्षांच्या चिमुकलीचा समावेश आहे. काळाने वाटेतच हेरलं अन विपरीत घडलं

सासरवाडीहून कपडे खरेदी साठी निघालेले कुटुंब गजानन वानखेडे (वय ४५), पल्लवी वानखेडे (वय ३८) आणि आरोही वानखेडे (वय ६) यांचा वाटेतच अपघात घडला आणि या दुर्दैवी अपघातात तिघांचाही करून अंत झाला. वानखेडे कुटुंब हे




समुद्रपूर तालुक्यातील कुर्ला येथील रहिवासी होते.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, गजानन वानखेडे हे आपल्या पत्नी आणि मुलीसह सासरवाडीला आले होते. तिथून ते सर्वजण मोपेड दुचाकीने कपडे खरेदी करण्यासाठी हिंगणघाट शहराकडे जात होते. वानखेडे कुटुंब राष्ट्रीय महामार्गावरून जात असताना, हॉटेल सगुना फॅक्टरीजवळ विरुद्ध दिशेने अत्यंत भरधाव वेगात येणाऱ्या एका अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला समोरून जोरदार धडक दिली. दुचाकीचा चक्काचूर, तिघांचाही मृत्यू हा अपघात इतका भीषण होता की, दुचाकीचा चक्काचूर झाला आणि दुचाकीवरील गजानन, पल्लवी व चिमुकली आरोही हे तिघेही रस्त्यावर फेकले गेले. गंभीर दुखापत झाल्याने तिघांचाही जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

तात्काळ रुग्णवाहिका बोलवून तिघांनाही उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, रुग्णालयातील डॉक्टरांनी तपासणी अंती त्यांना मृत घोषित केले. या घटनेतील सर्वात हृदयद्रावक बाब म्हणजे, अपघातात दगावलेली ६ वर्षांची चिमुकली आरोही ही जुळी बहीण होती. तिची दुसरी जुळी बहीण थोडक्यात बचावली आहे, मात्र आई-वडील आणि बहिणीच्या जाण्याने ती आता पोरकी झाली आहे.

## कॉकरोच जनता पार्टीने सगळे रेकॉर्ड्स मोडले

### इतिहासात पहिल्यांदाच घडलं, ध्रुव राठीलाही ओव्हरटेक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** - देशभरात सध्या कॉकरोच जनता पार्टीची सोशल मीडियावर जोरदार चर्चा रंगली आहे. लोकांनी सुरुवातीला याला गंमत समजलं, पण काही दिवसांतच हा विषय सोशल मीडियावर ट्रेंड होऊ लागला.

गेल्या १५ मे रोजी स्थापन झालेल्या कॉकरोच जनता पार्टीने सोशल मीडियावर धुमाकूळ माजवला असून फक्त आठ दिवसांत कॉकरोच जनता पार्टीचे एक कोटी १८ लाख ७० हजार फॉलोअर्स झाले आहेत. समाज माध्यमाच्या इतिहासात इतक्या कमी वेळात एखाद्या




चळवळीने फॉलोअर्सचा मिळवलेला हा सर्वाधिक आकडा आहे. कॉकरोच जनता पार्टीने ध्रुव राठीलाही केलं ओव्हरटेक देशातील सर्वात अधिक लोकप्रिय असलेला ब्लॉगर ध्रुव राठी यालाही कॉकरोच जनता पार्टीने फॉलोअर्सच्या बाबतीत ओव्हरटेक केलं आहे. केवळ १४४ तासांत कॉकरोच जनता पार्टीने १८.५ मिलियन सबस्क्राईबर मिळवले आहेत व हा एक इतिहास आहे. दरम्यान, छत्रपती संभाजीनगरमधील अभिजीत दीपके मराठमोळ्या तरुणाने अमेरिकेच्या बोस्टनमध्ये बसून 'कॉकरोच जनता पार्टी' नावाने एक वेबसाईट, इंस्टाग्राम हॅन्डल आणि एक्सचं खातं बनवलं. आणि बघता बघता संपूर्ण देशभर ही कॉकरोच जनता पार्टी अल्पावधीतच चर्चेचा विषय ठरली आहे. तरुणांचा देश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतात जर कोणी तरुणांचाच अपमान केला तर काय होतं याचा प्रत्यय एका चळवळीतून आला आहे.

## अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळविले

### वरुड पोलिस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** - सुट्टी घालवण्यासाठी मामाच्या गावाला मध्येप्रशदेशच्या हरदोलीमध्ये आलेल्या एका अल्पवयीन मुलीला अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेल्याची घटना नुकतीच वरुड बसस्थानकात घडली आहे. या प्रकरणी मुलीच्या मामाच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी निलेश सोमुजी उईके (२७), रा.हरदोली, ता.जि.पांढुर्णा यांची भाची सुट्टी निमित्त मामाच्या गावाला आली होती. सुट्टी संपल्यानंतर घटनेच्या दिवशी फिर्यादी निलेश त्यांची भाची आणि फिर्यादी निलेशचे जावई विलास कोकाटे हे सर्वजण तिला परत गावी सोडण्यासाठी घरातुन निघाले. वरुड बस स्थानकावर पोहोचल्यानंतर जावई विलास कोकाटे यांनी मुलीला मोर्शी जाणाऱ्या बसमध्ये व्यवस्थित बसवुन दिले. मुलगी बसमध्ये बसुन निघाल्यानंतर काही वेळाने फिर्यादी निलेशच्या बहिणीचा फिर्यादी निलेशला फोन आला. तिने सांगितले की, मुलगी अद्यापपर्यंत घरी पोहोचलेली नाही. सर्वत्र शोध घेऊनही मुलगी मिळुन आली नाही. त्यामुळे कोणीतरी अज्ञात इसमाने तिला फुस लावुन पळवुन नेल्याचा संशय बळावला. भाची घरी न पोहोचल्याने आणि कोणताही सुगावा न लागल्याने अखेर अल्पवयीन मुलीच्या मामांनी वरुड पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. फिर्यादी निलेश सोमुजी उईके (२७), रा.हरदोली, ता.जि.पांढुर्णा यांच्या तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार अर्जुन ठोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरुड पोलिस करीत आहेत.

## सर्व उच्च न्यायालयांनी ऑनलाईन सुनावणी घ्यावी : सरन्यायाधीशांची विनंती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** -देशभरातील सर्व उच्च न्यायालयांनी आभासी पद्धतीने सुनावणी घ्यावी, अशी विनंती सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी गुरुवारी केली.

इंधन बचतीचा उपाय म्हणून दिल्लीतील सर्व न्यायालयांना ऑनलाइन पद्धतीने कामकाज करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची विनंती एका वकिलाने केल्यानंतर सरन्यायाधीशांनी हे



वक्तव्य केले. आभासी सुनावणी सुलभ करण्यासाठी आपण यापूर्वीच उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीशांना पत्र लिहिले असल्याचे सांगत, सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले की न्यायिक पातळीवर असे निर्देश जारी करणे योग्य ठरणार नाही.

मी आधीच मुख्य न्यायाधीशांना विनंती केली आहे. बहुतेकांनी याची अंमलबजावणी देखील केली आहे. हे वकील संघटना आणि न्यायपीठ या दोन्ही बाजूंकडून ऐच्छिक स्वरूपात केले पाहिजे, असे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी वकिलाला सांगितले.

जेव्हा वकिलाने युक्तिवाद केला की, 'राष्ट्रीय हितासाठी' दिल्लीतील सर्व जिल्हा न्यायालयांसमोर आभासी सुनावणी सुरू केली पाहिजे.



# परभणी हिंगोली विधान परिषद निवडणूक, उमेदवाराचा स्थानिक विरुद्ध बाहेरील मुद्दा चर्चेत





(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – परभणी-हिंगोली विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर यंदा ‘स्थानिक विरुद्ध बाहेरील उमेदवार’ हा मुद्दा चांगलाच चर्चेत आला आहे. विद्यमान आमदार विप्लव बाजोरिया यांच्याविरोधात परभणीत नाराजीचा सूर उमटताना दिसत आहे. निवडणुकीची अधिकृत घोषणा होण्यापूर्वीच राजकीय वातावरण तापले असून विविध पक्षांकडून जागा मिळवण्यासाठी जोरदार हालचाली सुरू आहेत. त्याचवेळी इच्छुक उमेदवारांकडून पक्षश्रेष्ठींकडे लॉबिंगही वेगाने सुरू झाले आहे.

२०१८ मध्ये झालेल्या परभणी-हिंगोली विधान परिषद निवडणुकीत त्यावेळी एकसंघ असलेल्या शिवसेनेकडून अकोला येथील विप्लव बाजोरिया यांना उमेदवारी देण्यात आली होती. काँग्रेसचे सुरेश देशमुख यांच्या विरोधात लढलेल्या या निवडणुकीत बाजोरिया यांनी अवघ्या ३५ मतांनी विजय मिळवत विधान परिषदेत प्रवेश केला होता. मात्र, गेल्या आठ वर्षांत त्यांनी परभणी आणि हिंगोली जिल्ह्याशी सातत्याने संपर्क ठेवला नाही, असा आरोप आता स्थानिक पातळीवर जोर धरू लागला आहे.

विशेष म्हणजे, मागील काही दिवसांपासून सोशल मीडियावरही ‘स्थानिक उमेदवारालाच संधी द्या’ अशी मागणी मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे. अनेक कार्यकर्ते आणि नागरिकांकडून बाहेरच्या उमेदवाराला पुन्हा संधी देऊ नये, अशी भूमिका मांडली जात आहे.

# मविआच्या ३२ हरकती आणि ‘त्या’ इशाऱ्यानंतर निवडणूक आयोग उत्तर देणार : चोक्कलिंगम यांच्या आजच्या पत्रकार परिषदेकडे महाराष्ट्राचे लक्ष

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नागपूर** – राज्यातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम आज (शुक्रवार) दुपारी ३ वाजता एक महत्त्वाची पत्रकार परिषद घेणार आहेत.

महाविकास आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांनी दोन दिवसांपूर्वीच चोक्कलिंगम यांची भेट घेऊन मतदार यादी प्रक्रियेवर गंभीर संशय व्यक्त केला होता. या भेटीत मविआने ३२ हरकती आणि सूचनांचे निवेदन आयोगाला सादर केले होते. या राजकीय घडामोडींनंतर आयोगाने तातडीने ही पत्रकार परिषद बोलावल्याने, महाविकास आघाडीच्या प्रश्नांना आणि आरोपांना मुख्य निवडणूक अधिकारी काय उत्तर देतात, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

मविआचा गंभीर आरोप निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या मतदार याद्यांच्या सखोल विशेष फेरतपासणी सर्वेक्षणावर महाविकास आघाडीने तीव्र आक्षेप घेतला आहे. कागदपत्रे पूर्ण असतानाही अनेक पात्र मतदारांची नावे जाणीवपूर्वक वगळली जात असल्याच्या तक्रारी येत असल्याचा दावा विरोधकांनी केला आहे. या प्रक्रियेमागे मोठा राजकीय डाव असून, निवडणूक आयोगाने कोणत्याही राजकीय हस्तक्षेपाला बळी पडू नये. ही प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि निष्पक्षपणे राबवावी, अशी मागणी शिवसेना (ठाकरे), काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या नेत्यांनी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे केली आहे.

पश्चिम बंगालसारखी परिस्थिती महाराष्ट्रात होऊ देणार नाही ‘आमचा एसआयआर प्रक्रियेला विरोध नाही, पण ती पारदर्शक असावी. पश्चिम बंगालमध्ये अशाच प्रकारच्या प्रक्रियेतून भाजपला राजकीय फायदा झाला होता, तशी परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण होऊ नये,’ असा थेट इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनी दिला आहे. बीएलओ नियुक्त्यांमध्ये राजकीय दबाव असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी मतदार नोंदणी अधिकारी यांच्या नियुक्त्यांवरून थेट बोट ठेवलं आहे.

## आता गावकऱ्यांना मिळणार मोफत मिळकत पत्रिका

# सनद फी माफ करण्याची महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची घोषणा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**अमरावती** – ग्रामपंचायत नमुना ८ दुरुस्त केल्यानंतर गावकऱ्यांना स्वामित्व योजनेतून मोफत मिळकत पत्रिका देण्यासह सनद फी माफ करण्याची असल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

याबाबत ग्रामविकास विभागाने प्रस्ताव तयार करून त्याची मंजुरी घ्यावी असेही ते म्हणाले. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनीही या प्रकल्पाला गती देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील मालमत्तांचे वाद मिटण्यास मदत होणार असून, नागरिकांना आपल्या मालमत्तेचा कायदेशीर हक्क मिळणार आहे.

प्रकल्पाला गती देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल विभागाने राज्यातील २३ हजार ग्रामपंचायतींच्या ३९ हजार मालमत्तांची अद्यावत उपकरणांद्वारे मोजणी केली आहे, त्यामुळे मिळकत पत्रिका देण्याची प्रक्रिया जलद होऊ शकेल असे महसूलमंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले. कोकण विभागीय आयुक्तालयात बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवर व महसूलविभागाचे अधिकारी उपस्थित होते.

सनद फी माफ करण्याची महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची घोषणा ग्रामीण भागातील मालमत्तेचे मोजमाप करून, त्यांचे अचूक रेकॉर्ड तयार करणे हा स्वामित्व या योजनेचा मुख्य उद्देश आहे. आतापर्यंत राज्यातील ३९ लाख प्रॉपर्टीचे काम पूर्ण झाले असून, १८ हजार प्रॉपर्टी कार्डचे ऑनलाइन कामही पूर्णत्वास आले आहे. ज्या गावांचे काम पूर्ण झाले आहे, अशा गावांचे अंतिम नकाशे आणि चौकशी नोंदवही ग्रामपंचायतींना आता मोफत उपलब्ध करून दिली जाणार आहे.

नागरिकांना मिळणार थेट फायदे महसूलमंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, या योजनेमुळे आता गावठाणच्या बाजूने २०० मीटरपर्यंतच्या मालमत्तांचे मोजमाप करून ते रहिवासी भागासाठी अधिकृत केले जाईल. यामुळे नागरिकांना त्यांच्या घरांची अधिकृत मालकी हक्काची कागदपत्रे (सनद) मोफत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तसेच, गावस्तरावर 'नमुना ८' अद्ययावत करण्यासाठी आवश्यक असलेली माहिती ग्रामविकास विभागाला उपलब्ध करून दिली जाणार आहे.

# काजू पिकणार कोकणात, निर्यात केंद्र मात्र कोल्हापुरात! चंदगडमध्ये केंद्र उभारण्याचा प्रस्ताव

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – राज्यातील सर्वाधिक काजू उत्पादन कोकणातील सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या जिल्ह्यात होत असताना पहिली काजू बाजारपेठ, अत्याधुनिक नर्सरी, काजू निर्यात केंद्र, गोदाम आणि सेंटर ऑफ एक्सलन्स आदी सुविधा मात्र कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड येथे उभारण्यात येणार आहेत.

राज्यात मे २०२२ मध्ये काजू बोर्डाची स्थापना करण्यात आली. मात्र या मंडळाला स्वतःचे कार्यालय व अन्य सुविधा नव्हत्या. त्यामुळे मंडळाने राज्य औद्योगिक विकास महामंडळाकडे ४० एकर जागेची मागणी केली होती. त्यानुसार महामंडळाने चंदगड तालुक्यातील हलकर्णी येथे नाममात्र दरात ४० एकर जागा उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शविली आहे. या ठिकाणी काजू मंडळाचे विभागीय कार्यालय, अत्याधुनिक नर्सरी, काजूसाठी सेंटर ऑफ एक्सलन्स, काजू प्रक्रिया प्रकल्प, काजू निर्यात केंद्र, अद्यावत गोदाम तसेच देशातील पहिली काजू बाजार समिती उभारण्यात येणार आहे. वास्तवात राज्यात सर्वाधिक काजूची लागवड कोकणातील सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या जिल्ह्यात आहे आणि उत्पादनातही हे दोन्ही जिल्हे आघाडीवर आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यात काजू लागवडी खालील क्षेत्र ८० हजार हेक्टरच्या पुढे गेले आहे. हापूस आंब्याच्या बरोबरीने काजू हे जिल्ह्यातील महत्वाचे नगदी पीक ठरले आहे. तुलनेने कोल्हापूर जिल्ह्यात आजरा गडहिंग्लज आणि चंदगड या तालुक्यातच काही प्रमाणात काजूची लागवड आहे. उदय सामंत यांची उदासीनता? या पार्श्वभूमीवर काजू बाजार समिती व अन्य सुविधा सिंधुदुर्ग – रत्नागिरी या जिल्ह्यांच्या सीमेवर होणे योग्य ठरणार आहे. वास्तवात औद्योगिक विकास महामंडळ उद्योग खात्याच्या अखत्यारीत येते व रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत हे या खात्याचे मंत्री आहेत. असे असूनही काजू बाजार समिती कोल्हापूरला जाणे हे सामंत यांच्या उदासीनतेचे लक्षण असल्याचे प्रदेश जनता दलाचे कार्याध्यक्ष प्रभाकर नारकर, पक्षाचे सिंधुदुर्ग – रत्नागिरीचे संघटन सचिव संजय परब तसेच कोकण जनविकास समितीचे सुरेश रासम, जगदीश नलावडे, दिनेश राणे यांनी म्हटले आहे. जनता दल सेक्युलर महाराष्ट्र पक्षाने आणि कोकण जन विकास समितीने याला विरोध केला असून या सुविधा सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांच्या मध्यवर्ती ठिकाणी उभारण्यात याव्यात, अशी मागणी केली आहे. कोकण फक्त अणुऊर्जा प्रकल्पांसाठी? कोकण हे अरबी समुद्राच्या किनारपट्टीवर असून किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात मासेमारी चालते.

## तहसिलदार व ठाणेदार यांचे पुढाकाराने

# जप्त केलेली रेती घरकुल लाभार्थ्यांना वितरीत

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – येथे काही दिवसा पुर्वी अवैध वाहतुक करणारे टिप्पर जप्त करुन पालिस स्टेशनला लावण्यात आले होते. सदर वाहन मधील रेती तहसिलदार रामदास शेळके आणि ठाणेदार दीपक महाडीक यांचे पुढाकाराने सदर जप्त केलेली रेती घरकुल लाभार्थी यांना विना मुल्य देण्याचे सुचणेनुसार वितरीत करण्यात आली.

सदर रेतीचा पंचनामा मंडळ अधिकारी देवानंद मेश्राम व ग्राम महसुल अधिकारी राजेंद्र जंगले, महसुल सेवक ज्ञानेश्वर कवडे यांनी करुन सदर रेती शेंदुरजनाघाट येथील प्रकल्प अधिकारी विलास आठवले यांचे तांब्यामध्ये दिली.

त्यानुसार शेंदुरजनाघाट येथील घरकुल लाभार्थी प्रशांत लक्ष्मण दुपारे, आशा दवंडे, विनय बागडे, अशोक दवंडे, शुभम पाटील, प्रदीप बागडे, गुम्फा चक्रपाणी, आकाश पाटील, पंकज दवंडे, रुपेश दवंडे, यादवराव गोळे, अनिकेत मेटे आणि गौरक्षण संस्था वरुड यांना सर्व अधिकारी आणि लाभार्थी यांचे उपस्थितीमध्ये वितरीत करण्यात आली.

# विद्यार्थी जीवनात आदर असणे हाच शिक्षकांचा सन्मान

## स्नेह मिलन सोहळ्यात माणिकदास बेलुरकर यांचे प्रतिपादन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – आज संपूर्ण शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचें वातावरण चित्र-विचित्र झाले असतांनाच गेल्या २६ वर्षातील शालेय जीवनातुन मुक्त झाल्यावर संसार कुटुंब व्यवस्था सांभाळत असतांनाच आजही तोच आदर निर्माण होतो आणि सर्व विद्यार्थी एकत्रितपणे विद्यार्थी स्नेह मेळावा घडवुन आणुन शिक्षकांचा सन्मान राखतो. हेच चांगल्या विद्यार्थी जीवनाचे रहस्य आहे, असे विचार माणिकदास बेलुरकर यांनी काढले.

त ` पी.व्ही.साबळे जागृत विद्यालय सुरळी येथील सन १९९९-२००० बॅचचा स्नेह मिलन सोहळ्यात श्री हॉटेल'येथे बोलतांना म्हणाले. यावेळी सकाळी ३ वाजता स्नेह मेळाव्याचे उद्घाटन जयंत गोंडसे, विजय गजबे, सोमेश्वर लष्करे, लिलाधर कोल्हे, ज्योती तुपट, पुष्पा मोरे आदी मान्यवर शिक्षकांच्या हस्ते करण्यात आले.

प्रारंभी वर्षा गाडगे, प्रगती पखाले, प्रियंका कुकडे, माया जोगे, वैशाली कोहळे, सारीका हेलोडे यांनी राष्ट्रगीत व स्वागत गीताने व पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले. त्यानंतर मुला मुलींचे विविध खेळ, भाषा स्पर्धा, वाचन स्पर्धा व मनोगत झाले. यामध्ये प्रियंका कुकडे, मनिषा चिखलकर, सुवर्णा बहुरुपी, किर्ती चव्हाण, जितेंद्र भोसे, प्रकाश दौड, अमित कुकडे, दिनेश ध्यार, सुंदर परतेती, अमोल सोनारे, प्रविण महल्ले, रुपेश बहुरुपी, बाळु तायवाडे, उमेश निकम, पवार, कुकडे, कडु, शिरभाते, मोहोड यांचा समावेश होता. कार्यक्रमांचे प्रास्ताविक उमाकांत साबळे यांनी तर संचालन प्रा.प्रफुल्ल रामेकर यांनी केले.

या संपुर्ण कार्यक्रमाचे आयोजन शैलेश शेकापुरे, सचिन शेंडे, सुशिल मोहोड, कोहळे, बारस्कर यांनी घडवुन आणले. विद्यार्थी मेळाव्याचे आभार वर्षा गाडगे यांनी मानले. यावेळी सुरळी, कुरळीतील बहुतांश विद्यार्थी जे पुणे, मुंबई, पुसद, अमरावती येथुन येवुन त्यांनी उन्हाळ्यात तापमानवाढीमुळे हा कार्यक्रम वरुड शहरात ठेवला दिवाळीच्या सुट्टीत सुरळीच्या शाळेत कार्यक्रमांचे निमंत्रण आवाहन सोमेश्वर लष्करे यांनी केले.

# संपादकीय

चला आपले आज आपण येणाऱ्या पिढीच्या उज्वल भविष्या साठी त्याग करू.

## नाशिकला गुन्हेगारांचा बालेकिल्ला होण्यापासून वाचवणे : समाज, प्रशासन आणि नागरिकांची सामूहिक जबाबदारी

नाशिक हे महाराष्ट्रातील धार्मिक, सांस्कृतिक, औद्योगिक आणि शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाचे शहर म्हणून ओळखले जाते. कुंभमेळा, द्राक्षनगरी, उद्योगधंदे, पर्यटन आणि वेगाने वाढणारे नागरीकरण यामुळे नाशिकची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत वाढत्या गुन्हेगारीच्या घटनांनी नाशिकच्या प्रतिमेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. खून, खंडणी, टोळीवाद, अमली पदार्थांची तस्करी, मटका, अवैध धंदे, महिलांवरील अत्याचार, ऑनलाइन फसवणूक आणि वाढती दहशत यामुळे नाशिक जिल्हा गुन्हेगारांसाठी सुरक्षित ठिकाण बनत असल्याची भीती व्यक्त होत आहे. ही परिस्थिती चिंताजनक आहे. परंतु नाशिकला गुन्हेगारांचा बालेकिल्ला होण्यापासून वाचवण्याची जबाबदारी केवळ पोलिसांची आहे, असा समज करणे चुकीचे ठरेल. ही जबाबदारी प्रत्येक नाशिककराची आहे. गुन्हेगारी ही अचानक निर्माण होत नाही. ती समाजातील दुर्लक्ष, प्रशासनातील शिथिलता, राजकीय हस्तक्षेप, बेरोजगारी, सामाजिक असमानता आणि नागरिकांच्या निष्क्रियतेतून वाढीस लागते. एखादा गुन्हेगार एका दिवसात तयार होत नाही; समाजातील काही कमतरतांचा फायदा घेत तो आपले जाळे उभे करतो. त्यामुळे गुन्हेगारीविरोधातील लढा हा केवळ कायद्याचा विषय नाही, तर सामाजिक जबाबदारीचाही मुद्दा आहे. आज नाशिकमध्ये काही भागांत स्थानिक टोळ्यांचा प्रभाव, अवैध व्यवसायांचे जाळे आणि दबावगट निर्माण झाल्याच्या चर्चा वारंवार ऐकायला मिळतात. अनेकदा सामान्य नागरिक भीतीमुळे तक्रार करण्यास टाळाटाळ करतात. आपल्याला काय करायचं? किंवा गुंडांशी पंगा घेऊन उपयोग नाहीअशी मानसिकता गुन्हेगारांना अधिक बळ देते. जेव्हा समाज शांत राहतो, तेव्हा गुन्हेगार निर्भय होतात. त्यामुळे नागरिकांनी गुन्हेगारीकडे तमाशा म्हणून न पाहता, ती स्वतःच्या सुरक्षेचा प्रश्न मानणे गरजेचे आहे. पोलिस यंत्रणा महत्त्वाची असली तरी ती मर्यादित साधनसामग्री आणि मनुष्यबळावर काम करते. प्रत्येक गल्ली, प्रत्येक परिसर, प्रत्येक संशयास्पद हालचालीवर पोलिसांचे लक्ष असणे शक्य नसते. येथे नागरिकांची भूमिका महत्त्वाची ठरते. परिसरात संशयास्पद हालचाली दिसल्यास पोलिसांना माहिती देणे, अवैध व्यवसायांविरोधात आवाज उठवणे, सोशल मीडियावर अफवा न पसरवता सत्य परिस्थिती प्रशासनापर्यंत पोहोचवणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. यासोबतच पालकांची जबाबदारीही मोठी आहे. अनेकदा बेरोजगारी, चुकीची संगत, जलद पैसा कमावण्याची लालसा आणि सोशल मीडियावरील दिखाऊ जीवनशैली यामुळे काही तरुण गुन्हेगारीच्या मार्गावर वळतात. घरातील संवाद कमी होणे, मुलांच्या वर्तनाकडे दुर्लक्ष करणे, अचानक वाढलेला खर्च किंवा संशयास्पद मित्रपरिवार याकडे दुर्लक्ष केल्यास परिस्थिती गंभीर बनते. गुन्हेगारांच्या टोळ्या अशा तरुणांना सहज आपल्या जाळ्यात ओढतात. त्यामुळे शिक्षणासोबत मूल्यसंस्कार, सामाजिक जाणीव आणि कायद्याबद्दल आदर निर्माण करणे आवश्यक आहे. नाशिकमध्ये वाढणाऱ्या अमली पदार्थांच्या प्रश्नाकडेही गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. अनेक शहरांप्रमाणे नाशिकमध्येही ड्रग्जचे जाळे पसरत असल्याच्या तक्रारी वेळोवेळी पुढे येतात. जर युवक पिढी व्यसनाधीन झाली तर समाजाचे भवितव्य धोक्यात येईल. शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, पालक संघटना आणि पोलिस यांनी संयुक्त मोहिमा राबवून व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणे अत्यावश्यक आहे. राजकीय इच्छाशक्ती हा देखील महत्त्वाचा मुद्दा आहे. गुन्हेगारांना राजकीय संरक्षण मिळत असल्याची भावना निर्माण झाली तर कायद्यावरील विश्वास डळमळतो. कोणताही गुन्हेगार कितीही प्रभावशाली असो, त्याच्यावर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. कायद्यापुढे सर्व समान आहेत, हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून गेला पाहिजे. अन्यथा गुन्हेगारीचा आत्मविश्वास वाढतो आणि सामान्य माणूस भयभीत होतो.

# “खरे मोठेपण खुर्चीत की वागण्यात?”




‘सन्मान द्या माणसाला:’ ‘जगण्याला मरण म्हणालो नाही: डबक्याला धरण म्हणालो नाही: इतकेच मी म्हणालो’ सन्मान द्या माणसाला: या काही ओळी नाहीत, तर समाजातील ढोंगीपणा, अहंकार आणि विषमतेवर मारलेला थेट प्रहार आहेत. कारण आज माणूस जगतोय खरा, पण त्याच्या जगण्याला किंमत उरलेली नाही. सन्मान, समानता आणि माणुसकी या गोष्टी फक्त भाषणात दिसतात; प्रत्यक्षात मात्र माणूस माणसापासून दूर जात आहे. आज अनेक ठिकाणी काही लोक पद, पैसा, सत्ता किंवा प्रतिष्ठेचा इतका गर्व बाळगतात की त्यांना स्वतःशिवाय दुसरे कोणी मोठे वाटत नाही. ‘मीच खरा’, ‘माझेच बरोबर’ या अहंकारात ते वावरतात. सोबत विचार करणारे, प्रश्न विचारणारे किंवा स्पष्ट बोलणारे लोक त्यांना आवडत नाहीत. कारण सत्य ऐकण्याची ताकद अहंकारात नसते. हुजेरी करणारे, हो ला हो म्हणणारे आणि फक्त स्तुती करणारे लोक त्यांना चांगले वाटतात. पण जे स्पष्टपणे वास्तव मांडतात, अन्यायावर बोलतात, चुकीला चुकी म्हणतात – त्यांनाच ‘विरोधक’, ‘बंडखोर’ किंवा ‘चुकीचे’ ठरवले जाते. वरून ‘एक व्हा’, ‘संघटित राहा’ असे सांगितले जाते; पण आतून मात्र विषमता पसरवली जाते. गटबाजी केली जाते. गरीब, सामान्य आणि संघर्ष करणाऱ्या माणसाला कमी लेखले जाते.

आज समाजात गरीबाचा राग केला जातो, पण त्याच्या वेदना समजून घेतल्या जात नाहीत. मेहनत करणारा माणूस मागे पडतो आणि दिखावा करणारे पुढे जातात. पद मिळाले की काही लोकांना वाटते त्यांनी माणुसकीच विकत घेतली आहे. पण खरे मोठेपण खुर्चीत नसते, ते वागण्यात असते.माणूस जोडणे कठीण असते आणि तोडणे खूप सोपे. म्हणून जो माणसाला सन्मान देतो, त्याच्या विचारांना ऐकतो, मतभेद असूनही सोबत घेऊन चालतो – तोच खरा नेता आणि तोच खरा माणूस. बाकी पदे, सत्ता आणि प्रसिद्धी या क्षणिक गोष्टी आहेत. समाजाला आज गरज आहे ती मोठमोठ्या घोषणांची नाही, तर माणुसकीची. जात, धर्म, पैसा, पद या चौकटींपलीकडे जाऊन प्रत्येकाला माणूस म्हणून स्वीकारण्याची. स्पष्ट बोलणाऱ्यांचा आवाज दाबण्याऐवजी त्यातून सत्य समजून घेण्याची. कारण आरसा कधीच खोटे बोलत नाही. म्हणूनच आज पुन्हा एकदा सांगावेसे वाटते – ‘जगण्याला मरण म्हणालो नाही: डबक्याला धरण म्हणालो नाही: इतकेच मी म्हणालो’ सन्मान द्या माणसाला!

प्रफुल्ल मंदा श्रीधर
जिल्हाकार्याध्यक्ष
महा.अनिस अमरावती.
९६६५१८५४२८

# पेपरफुटीचे विष आणि शिक्षणव्यवस्थेचे भग्न आरसे

### नीट प्रकरणाकडे फक्त ‘गुन्हा’ म्हणून पाहणे पुरेसे नाही




भारतात एखादी परीक्षा म्हणजे केवळ परीक्षा नसते. ती लाखो कुटुंबांच्या आशा, भीती, कर्ज, त्याग, सामाजिक प्रतिष्ठा आणि भवितव्य यांचे एकत्रित ओझे असते. विशेषतः नीट सारखी परीक्षा तर अनेक मध्यमवर्गीय आणि ग्रामीण कुटुंबांसाठी आयुष्य बदलण्याचे स्वप्न असते. कुणाच्या आईने दागिने गहाण ठेवलेले असतात, कुणाच्या वडिलांनी शेती विकलेली असते, कुणी दोन वर्षे गाव सोडून कोचिंगसाठी शहरात राहिलेला असतो, तर कुणी दिवसभर मजुरी करून रात्री अभ्यास केलेला असतो.

अशा वेळी जर त्या परीक्षेभोवती पेपर फुटला, गुणांमध्ये संशय, ग्रेस मार्क्स, नेटवर्क, दलाल, कोचिंग लॉबी, राजकीय संरक्षण, डार्क वेब, सॉल्वर गँग अशी शब्दावली फिरू लागली, तर तो केवळ एक शैक्षणिक घोटाळा राहत नाही; तो संपूर्ण समाजाच्या नैतिक कण्यावर घाव बनतो.

आज नीट पेपरफुटीभोवती निर्माण झालेला गोंधळ हा फक्त एका परीक्षेचा प्रश्न नाही. तो भारताच्या शिक्षणव्यवस्थेतील वाढत्या व्यापारीकरणाचा, बेरोजगारीच्या भीषण दडपणाचा, स्पर्धेच्या विकृत मॉडेलचा आणि नैतिक अध:पतनाचा आरसा आहे.

प्रश्न इतकाच नाही की पेपर कुणी फोडला? प्रश्न हा आहे की अशी व्यवस्था तयारच का झाली जिथे पेपरफुटी हा व्यवसाय बनतो?

भारतामध्ये गेल्या काही वर्षांत पेपरफुटीचे प्रमाण भयानकरीत्या वाढले आहे. विविध अहवालांनुसार २०१८ नंतर देशात शेकडो भरती परीक्षा आणि प्रवेश परीक्षा वादग्रस्त ठरल्या. राजस्थान, बिहार, उत्तर प्रदेश, गुजरात, हरियाणा, महाराष्ट्र, मध्य प्रदेश अशा अनेक राज्यांमध्ये पोलीस भरतीपासून शिक्षक भरतीपर्यंत आणि वैद्यकीय प्रवेशापर्यंत पेपरफुटीचे जाळे उघड झाले.

नीट प्रकरणात बिहारमधील कथित सॉल्वर गँग, प्रश्नपत्रिका आधी उपलब्ध झाल्याच्या चर्चा, काही केंद्रांवरील संशयास्पद गुण, ग्रेस मार्क्सचा वाद आणि सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेलेल्या याचिका यांनी देश हादरला. राष्ट्रीय परीक्षा संस्था वरच प्रश्नचिन्ह उभे राहिले. जेव्हा परीक्षा घेणाऱ्या संस्थेवरील विश्वासच ढासळतो, तेव्हा प्रामाणिक मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांचा न्यायव्यवस्थेवरचा विश्वास कोसळतो. मेहनतीपेक्षा नेटवर्क मोठे, अभ्यासा-पेक्षा पैसा प्रभावी अशी मानसिकता रुजली तर समाजाचा पाया डळमळतो.

या सगळ्याचा सर्वांत गंभीर परिणाम विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर होतो. कोटा, पुणे, हैदराबाद, दिल्ली, पटना, लातूर यांसारख्या कोचिंग केंद्रांमध्ये हजारो विद्यार्थी नैराश्य, चिंता आणि अपयशाच्या भीतीत जगतात. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या आकडेवारीनुसार विद्यार्थी आत्महत्यांचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढले आहे. ही केवळ वैयक्तिक अपयशाची गोष्ट नाही, तर संपूर्ण सिस्टीमने निर्माण केलेला दबाव आहे. भारतात शिक्षण हे आता ज्ञानप्राप्तीचे माध्यम उरलेले नाही; ते सामाजिक सुरक्षा योजना बनले आहे. लाखो पालक कर्ज काढतात, जमीन विकतात आणि खासगी कोचिंगला लाखो रुपये मोजतात. नीट कोचिंग उद्योगाची उलाढाल हजारो कोटींमध्ये आहे. परीक्षा जितकी कठीण आणि भयावह, तितका हा उद्योग फोफावतो. ही पेपरफुटी केवळ गुन्हेगारांची समस्या नाही; ते संपूर्ण स्पर्धा अर्थव्यवस्थेचे उपउत्पादन आहे.

पेपरफुटीमागील मूळ कारणे समजून घेतली पाहिजेत. पहिले कारण म्हणजे बेरोजगारी आणि संधींची कमतरता. वर्षाला कोट्यवधी विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांना बसतात; पण गुणवत्तापूर्ण रोजगाराच्या संधी मर्यादित आहेत. त्यामुळे प्रत्येक परीक्षा जगण्याची शेवटची संधी बनते. दुसरे कारण म्हणजे शिक्षणाचे व्यापारीकरण. कोचिंग क्लासेस, टेस्ट सिरीज, रँकिंग उद्योग, एजंट आणि प्रवेश सल्लागार यांनी विद्यार्थ्यांभोवती आर्थिक जाळे विणले आहे.

तिसरे कारण म्हणजे परीक्षा-केंद्रित शिक्षण. जिज्ञासा, संशोधन आणि कौशल्यांऐवजी फक्त एमसीक्यू सोडवण्याची क्षमता महत्त्वाची झाली आहे. एका तीन तासांच्या परीक्षेवर संपूर्ण आयुष्य अवलंबून ठेवले जाते.

चौथे कारण म्हणजे संस्थात्मक निष्काळजीपणा आणि भ्रष्टाचार. प्रश्नपत्रिका छपाईपासून वितरणापर्यंत सुरक्षा साखळी कमकुवत झाली, आतल्या लोकांचा सहभाग वाढला किंवा जबाबदारी निश्चित झाली नाही, तर कोणतीही परीक्षा सुरक्षित राहू शकत नाही.

आता फक्त निषेध पुरेसा नाही. मूलभूत बदल हवेत. सर्वांत आधी परीक्षा व्यवस्थेचे पूर्ण पुनर्रचन करावे लागेल. एका दिवसाच्या, एका प्रश्नपत्रिकेच्या आणि एका रँकच्या आधारावर आयुष्य ठरवण्याची पद्धत बदलली पाहिजे. शालेय कामगिरी, बहुपर्यायी मूल्यमापन, प्रात्यक्षिक कौशल्य, मुलाखती आणि दीर्घकालीन शैक्षणिक नोंदी यांचा समावेश करावा. ऑनलाइन परीक्षा, मल्टिपल सेशन्स, रँडमाइज्ड प्रश्न, AI-आधारित प्रॉक्टरिंग आणि बायोमेट्रिक सुरक्षेचा वापर वाढवावा; पण त्याच वेळी “single exam, single day” या धोकादायक अतिरेकातूनही बाहेर पडावे.

दुसरे म्हणजे सरकारी शिक्षणव्यवस्था मजबूत करावी. सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांच्या जागा लक्षणीयरीत्या वाढवल्या पाहिजेत. ग्रामीण आणि निम्नमध्यमवर्गीय विद्यार्थ्यांसाठी समान संधी निर्माण केल्याशिवाय कोचिंग उद्योगाचे साम्राज्य थांबणार नाही. कौशल्य-आधारित आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रोत्साहन देऊन डॉक्टर/इंजिनिअरच व्हायला हवे या एकमेव ध्यासातून तरुणांना मुक्त करावे.

तिसरे म्हणजे परीक्षा घेणाऱ्या संस्थांची स्वायत्तता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करावे. आरसीसी सारख्या संस्थांवर संसदीय देखरेख, नियमित तांत्रिक ऑडिट, स्वतंत्र चौकशी यंत्रणा आणि पारदर्शकता आवश्यक आहे. पेपरफुटी झाली तर केवळ खालच्या कर्मचाऱ्यांना नव्हे, तर उच्च अधिकाऱ्यांनाही जबाबदार धरले गेले पाहिजे. स्वतंत्र जार्लीवीरप यंत्रणाही उपयुक्त ठरेल.

चौथे म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये नैतिक शिक्षण आणि सामाजिक संवेदनशीलता निर्माण करावी. कसेही करून जिंकणे ही मानसिकता थांबवावी. कोचिंग उद्योगावर फी नियंत्रण आणि जाहिरातींवर बंधने घालून त्याचे अतिरेक रोखावेत.

आजची सर्वांत मोठी भीती ही आहे की आपण या घटनांना सामान्य मानू लागलो आहोत. भरती परीक्षा रद्द झाली? चालायचंच. पेपर फुटला? नेहमीचंच. ही मानसिकता लोकशाहीसाठी धोकादायक आहे. अन्यायाची सवय लागली की न्यायासाठीची चीड मरते.

भारतातील तरुणाई ही केवळ लोकसंख्या नाही; ती या देशाची भविष्यातील बौद्धिक आणि नैतिक शक्ती आहे. जर तिच्याच मनात व्यवस्थेविषयी अविश्वास, संशय आणि संताप साचला, तर त्याचे परिणाम शिक्षणापुरते मर्यादित राहणार नाहीत. ते प्रशासन, राजकारण, न्यायव्यवस्था आणि संपूर्ण समाजव्यवस्थेपर्यंत पोहोचतील.

म्हणून नीट पेपरफुटीकडे केवळ गुन्हेगारी घटना म्हणून पाहणे चूक आहे. ही घटना आपल्याला सांगते आहे की भारतात शिक्षणव्यवस्थेचे बाह्य रूप आधुनिक झाले असले, तरी तिच्या आत विश्वासाची भेग पडली आहे. आणि कोणत्याही राष्ट्रासाठी सर्वांत मोठा धोका हा इमारती पडण्यात नसतो, तर तरुणांच्या मनातील विश्वास ढासळण्यात असतो.

ॲड.शीतल शामराव चव्हाण
(मो. ९९२१६५७३४६)

# स्वयंनियमनाचे आवाहन आणि पोटशूळ

सामान्य माणूसही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देतो असा आजवरचा अनुभव आहे. यावेळीही सामान्य माणूस इंधन बचतीचे आणि सोने खरेदीवर नियंत्रण आणण्याचे आवाहन प्रत्यक्षात आणेल, यात शंका नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचतीचे आणि सोने खरेदी वर्षभर थांबवण्याचे केलेले आवाहन विरोधी पक्षांना नेहमीप्रमाणे पचले नाही. पश्चिम बंगाल आणि आसाममधील दणदणीत पराभवामुळे पंतप्रधान मोदी आणि भारतीय जनता पक्ष विरोधातील मळमळ बाहेर काढण्याची विरोधकांची संधी हुकली होती. इंधन बचतीच्या आवाहनानंतर युवराज राहुल गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी देशाच्या आर्थिक स्थितीचा संदर्भ घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरुद्ध गरळ ओकली. असे करून या मंडळींना समाधान वाटत असल्याने कोणाला त्याबाबत आक्षेप घेण्याचे कारण नाही. सततच्या पराभवामुळे आणि विजयाची शक्यता दृष्टिपथात नसल्यामुळे



मोदी सरकारच्या प्रत्येक निर्णयाविरुद्ध गैरसमज निर्माण करण्यासाठी खोटी माहिती पसरवण्याचे उद्योग काँग्रेस आणि अरविंद केजरीवाल यांच्यासारखे अन्य विरोधक सातत्याने करीत असतात. देशातील जनतेला भ्रमित करण्याच्या कुटील हेतूने हे राजकारण खेळले जाते. मात्र जनतेला गांधी व केजरीवाल यांचे कुटील राजकारण ठावूक असल्याने जनता अशा गलिच्छ राजकारणाला फारशी धूप घालत नाही व घालणार नाही. इराण-अमेरिका युद्ध सुरू झाल्यानंतर गॅस टंचाईबाबतच्या अफवा काँग्रेसने पसरवल्यामुळे गॅससाठी कशा मोठ्या रांगा लागल्या होत्या हे आपण पाहिले आहेच. एवढ्या अफवा पसरवूनही पश्चिम बंगालमध्ये भारतीय जनता पक्षाने बहुमत मिळवलेच, त्याखेरीज आसामसारखे राज्यही मोठ्या बहुमताने स्वतःकडे राखले. विरोधकांच्या अफवा पसरवण्याचा जनतेच्या मनावर व मोदी सरकारबाबत असलेल्या दृढविश्वासावर काडीमात्र परिणाम होत नाही, हेच या निकालांनी दाखवून दिले असे म्हटले तर ते अतिरंजित किंवा अविश्वसनीय वाटणार नाही.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# नसरापूर अत्याचारप्रकरणी २८ मे रोजी दोषारोप ठेवणार

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**पुणे** – नसरापूर (ता. भोर, जि. पुणे) येथील अल्पवयीन बालिकेवरील अत्यंत गंभीर लैंगिक अत्याचार आणि खून खटल्याची महत्त्वपूर्ण सुनावणी गुरुवारी पुण्यातील जिल्हा व विशेष न्यायालयात पार पडली. या सुनावणीदरम्यान न्यायालयाने अत्यंत महत्त्वाचे आदेश देत, आरोपी भीमराव प्रभाकर कांबळे याच्यावर पुढील सुनावणीच्या वेळी म्हणजेच येत्या २८ मे रोजी दोषारोप निश्चित केले जातील, असे स्पष्ट केले आहे. राजगड पोलीस स्टेशन अंतर्गत दाखल असलेल्या या संवेदनशील गुन्ह्यामध्ये आरोपी भीमराव कांबळे याच्याविरुद्ध विविध कलमांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांच्या वतीने न्यायालयासमोर तब्बल ११०० पानांचे अत्यंत सविस्तर दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

# गडचिरोलीत एसटीच्या अपघातात सात महिन्यांच्या चिमुकल्यासह तिघांचा मृत्यू

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**गडचिरोली** – चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे कठडे तोडून एसटी बस रस्त्याच्या कडेला उलटली. लालपरीच्या या अपघातात सात महिन्यांच्या चिमुकल्यासह तिघांचा मृत्यू झाला आहे. तर तब्बल ३३ प्रवासी जखमी झाले आहेत. गडचिरोलीहून उमरखेडकडे जाणाऱ्या एसटी महामंडळाच्या लालपरी बसचा गुरुवारी सकाळी अपघात झाला. या अपघातात ख्वाजा शाहबुद्दीन, लक्ष्मीबाई दुरकीवार आणि सात महिन्यांचा शिवांश नवघरे अशी मृतांची नावे आहेत. त्यामुळे भरधाव बसने रस्त्यालगतचा लोखंडी कठडा तोडला आणि थेट शेतात जाऊन पलटी झाली. अपघात इतका भीषण होता की बसमध्ये एकच आरडाओरड आणि गोंधळ उडाला. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू करत काही प्रवाशांना खिडक्या फोडून बाहेर काढले.



# एसबीआय उद्यापासून आठवडाभर बंद

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** – देशातील सर्वात मोठी सार्वजनिक क्षेत्रातील बँक असलेल्या एसबीआयच्या ग्राहकांनी आजच आपली सर्व महत्त्वाची शाखा-संबंधित कामे पूर्ण करावीत. कारण एसबीआयच्या शाखा २३ ते २८ मे २०२६ या काळात सलग सहा दिवस बंद राहण्याची शक्यता आहे. यामागील मुख्य कारण म्हणजे वीकेंड, प्रस्तावित दोन दिवसांचा कर्मचारी संप आणि भारतीय रिझर्व्ह बँकेने बकरीद निमित्त जाहीर केलेली दोन दिवसांची सुट्टी. २३ ते २८ मे दरम्यान एसबीआय बँका का बंद राहू शकतात? २३ ते २८ मे दरम्यान बँकांच्या कामकाजात व्यत्यय येण्याची विविध कारणे आहेत. वीकेंडच्या सुट्ट्या: २३ मे हा महिन्याचा चौथा शनिवार आहे आणि २४ मे हा रविवार आहे.




## लोणीच्या न्यु कॅलिफोर्निया कॉन्व्हेंटचे विद्यार्थी

# स्वरित आणि उत्कर्षचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश



(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरुड** – येथुन जवळच असलेल्या लोणी येथील न्यु कॅलिफोर्निया इंग्लिश कॉन्व्हेंट लोणीचे पाचवीचे विद्यार्थी स्कॉलरशिप परीक्षेत पात्र ठरले आहे.

वर्ग पाचवीतील ५ विद्यार्थ्यांपैकी दोन विद्यार्थी स्वरित अनिल राईकवार याने २९८ पैकी १३८ गुण प्राप्त गुण केले आणि उत्कर्ष छत्रपती गावंडे या विद्यार्थ्याने २९८ पैकी १३४ गुण प्राप्त केले. विशिष्ट इंग्लिश मिडीयमची शिकवणी नसतांना सुद्धा स्वबळावर आणि पालकांच्या, वर्ग शिक्षिकेच्या मार्गदर्शनाने एवढे गुण घेणे या मुलांसाठी खरोखर कठीण होते परंतु जिद्द असली तर काहीही शक्य होऊ शकते, हे या विद्यार्थ्यांनी दाखवुन दिले आहे. शाळेला विद्यार्थ्यांचा अभिमान आहे. यशाचे श्रेय विद्यार्थ्यांनी पालक आणि शिक्षकांना दिले आहे.

# ठाणे आग: सहाय्यक आयुक्तांना निलंबित करा, आमदार केळकर यांची मागणी

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**ठाणे** – गावदेवी भाजी मार्केटला गुरुवारी पहाटे लागलेली आग ही प्रशासनाच्या बेजबाबदारपणाचे बळी आहे. त्यामुळे या घटनेला जबाबदार असलेल्या सहाय्यक आयुक्तांना तत्काळ निलंबित करा, अशी मागणी आमदार संजय केळकर यांनी केली आहे. आगीची घटना कळल्यानंतर आमदार संजय केळकर यांनी धाव घेत गावदेवी मार्केटमधील



आपद्ग्रस्तांची भेट घेतली आणि त्यांना धीर दिला. यावेळी उपमहापौर कृष्णा पाटील, भाजपचे स्थानिक नगरसेवक उपस्थित होते. यावेळी येथील एका तरुण व्यापाऱ्याने अनुभव कथन करत प्रशासनाचा बेजबाबदारपणा निदर्शनास आणून दिला. आग लागताच या व्यापाऱ्याने दादोजी कोंडदेव स्टेडियम येथे धाव घेत उपस्थित अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्याला माहिती दिली. मात्र त्याने कोणतीही हालचाल केली नाही. येथील अग्निशमन दल हलविण्यात आल्याने अखेर बाळकुम येथून मदत पोहोचायला अर्ध्या तासाहून अधिक वेळ लागला, अशी माहिती या व्यापाऱ्याने केळकर यांना दिली. यावेळी आमदार संजय केळकर यांनी प्रशासनाच्या नाकर्तेपणाबाबत संताप व्यक्त केला.

## जनता इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थीनींचे

# शिष्यवृत्ती व आरटीएसई परीक्षेत घवघवीत यश

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – जनता शिक्षण संस्था द्वारा संचालित जनता इंग्लिश स्कूल मधील पुर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२५-२६ या सत्रातील वर्ग पाचवीची विद्यार्थिनी ओवी दिनेश शिंगरवाडे या विद्यार्थिनीने ५३ टक्के गुण प्राप्त करुन ती या परिक्षेत पात्र ठरलेली आहे.

वर्ग दुसरी ते सहावी पर्यंत आरटीएसई ही परीक्षा राबविण्यात आली होती ही परीक्षा जागृत शाळा वरुड येथे घेण्यात आली होती. ही राज्यस्तरावरील परीक्षा होती. या



परीक्षेमधुन वर्ग सहावीचे विद्यार्थिनी मधुरा आशिष फरकाडे या विद्यार्थीनीने जिल्हातुन दुसरा क्रमांक पटकाविलेला आहे. या दोन्ही विद्यार्थ्यांचे जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जगदीश काळे, उपाध्यक्ष अरुण काळे, सतीश सोलोव, सचिव मोहन गणोरकर, सहसचिव चंद्रशेखर टाकरखेडे, सर्व संचालक मंडळ, शाळेच्या मुख्याध्यापिका जयश्री आंडे, शिक्षक, शिक्षिका, इतर कर्मचारी वर्ग व सर्वांनी या दोन्ही मुलीचे भरभरुन कौतुक व अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# मॉर्निंग वॉकला गेलेल्या ५० वर्षीय व्यक्तीला संपवलं

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**परभणी** – परभणीच्या पूर्णा शहरातील 'गुड मॉर्निंग रोड' परिसरात आज सकाळी एक अत्यंत धक्कादायक आणि थरारक घटना उघडकीस आली आहे. नियमितप्रमाणे मॉर्निंग वॉक आणि व्यायामासाठी गेलेल्या एका ५० वर्षीय इसमाला अज्ञात व्यक्तीने धारदार शस्त्राने पोटात वार करून संपवले. या घटनेमुळे पूर्णा शहरात मोठी खळबळ उडाली आहे. देवराव बैजाजी साखरे (वय ५०) असे मयत व्यक्तीचे नाव आहे.

# हार्बर मार्गावरील एसी लोकलला प्रवाशांची पसंती : प्रवासी संख्या ६५ टक्क्यांनी वाढली

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** – मध्य रेल्वेच्या हार्बर मार्गावरील वातानुकूलित (एसी) उपनगरी सेवांना प्रवाशांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. मध्य रेल्वेच्या हार्बर मार्गावरील वातानुकूलित (एसी) उपनगरी सेवांना प्रवाशांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. गेल्या पंधरवड्यात प्रवासी संख्येत तब्बल ६५ टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे. यामुळे प्रवासी संख्येबरोबरच महसुलातही मोठी वाढ झाली आहे.

हार्बर मार्गावर एसी उपनगरी सेवा २६ जानेवारी




२०२६ पासून सुरू करण्यात आली. सुरुवातीपासूनच या सेवांना प्रवाशांचा प्रतिसाद मिळत असल्याने मध्य रेल्वेने १ मे २०२६ पासून आणखी १४ अतिरिक्त एसी फेऱ्या सुरू केल्या. त्यामुळे मध्य रेल्वेच्या एसी उपनगरी सेवांची एकूण संख्या १०८ वर पोहोचली असून त्यामध्ये मुख्य मार्गावरील ८० आणि हार्बर मार्गावरील २८ सेवांचा समावेश आहे. मध्य रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, १६ एप्रिल ते ३० एप्रिल आणि १ मे ते १५ मे या दोन पंधरवड्यांत हार्बर मार्गावरील एसी लोकलमधील प्रवासी संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे.

महसुलात ६६ टक्क्यांनी वाढ प्रवासी संख्येबरोबरच महसुलातही मोठी वाढ झाली आहे. हार्बर मार्गावरील एसी सेवांमधून मिळणारा महसूल १.१८ कोटी रुपयांवरून १.९६ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला असून, त्यामध्ये ६६.४३ टक्क्यांची वाढ झाली आहे.

तसेच विनातिकिटविना प्रवास रोखण्यासाठी मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाकडून एसी लोकल आणि स्थानकांवर विशेष तिकीट तपासणी मोहिमा सातत्याने राबविण्यात येत आहेत. या मोहिमांद्वारे विनातिकीट प्रवाशांवर कारवाई करून दंड वसूल करण्यात येत आहे.

## बेनोड्याच्या न्यु कॅलिफोर्निया इंग्लिश प्राइमरी स्कूलच्या विद्यार्थ्यांचे

# शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये घवघवीत यश

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरुड** – न्यु कॅलिफोर्निया इंग्लिश प्राइमरी स्कूल बेनोडा (श.) येथील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे, प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२५-२६ मध्ये मोठ्या संख्येने यश प्राप्त केले आहे.



वर्ग ५ वी मधील देवेश अलोने, स्वरा घोडकी, परी वाघ, नेत्रा निंभोरकर, रेवा पांडे, कृष्णाली गेडाम, प्राची फरकाडे, वर्ग ८ वी मधील आर्या निंभोरकर हे विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये पात्र ठरले आहेत. सर्व गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन केल्या जात आहे.

या गुणवंत विद्यार्थ्यांचे शाळेचे गुरु सेवा शैक्षणिक विकास संस्थेचे अध्यक्ष अमोल निंभोरकर, संस्थेचे उपाध्यक्ष पंकज गोहाड, सचिव स्वाती निंभोरकर व संस्थेच्या इतर पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले तसेच शाळेचे मुख्याध्यापक हर्षल झोड, न्यु कॅलिफोर्निया इंग्लिश प्राइमरी स्कूल बेनोडा शहीद येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

## श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयाची

# दिव्यांका कुरवाडे शिष्यवृत्ती परीक्षेत पास

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरुड** – महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे द्वारा वर्ग ५ करीता पुर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन केले जाते. या परीक्षेमध्ये श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयाने सक्रिय सहभाग घेत पालकांच्या अनुमतीने बहुसंख्य विद्यार्थ्यांना परीक्षेत प्रविष्ट केले होते. याची फलश्रुती म्हणुन कुमारी दिव्यांका गजानन कुरवाडे ही विद्यार्थिनी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये पास झाली आहे.



अत्यंत कुशाग्र बुद्धीची असणारी दिव्यांका हीने आपल्या वडिलांचे अपुर्ण राहिलेले स्वप्न पुर्ण करण्यास नवोदय परीक्षेमध्ये सुद्धा यश संपादन करीत नवोदय विद्यालयामध्ये प्रवेश मिळविला आहे. इयत्ता चौथी पर्यंत जिल्हा परिषद शाळेमध्ये धडे गिरवल्यानंतर तिने श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयामध्ये प्रवेश घेण्याचे ठरवले. दिव्यांकाच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या यशाचे श्रेय ती आपल्या आई-वडील, आजी, बहीण आणि गुरुजनांना देत आहे. दिव्यांकाच्या उज्वल यशस्वी शैक्षणिक वाटचालीकरीता संस्था पदाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक एस.व्ही.खोडे, पर्यवेक्षक व्ही.एच.चिमोटे, मार्गदर्शक शिक्षक पी.एम.बानाईत, वर्ग शिक्षक डी.एस.सातंगे तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

## अधिक मास (पुरुषोत्तम मास) चे औचित्य साधुन

# एकदरा येथे संगीतमय श्री साई कथा व ग्रामगीता प्रवचन

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरुड** – अधिक मास (पुरुषोत्तम मास) चे औचित्य साधुन एकदरा गावातील स्वयंभु पार्वती माता देवस्थानात संगीतमय श्री साई कथा व ग्रामगीता प्रवचन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

श्री गुरुदेव सेवा मंडळ एकदरा व समस्त ग्रामवासी यांच्या संयुक्त विद्यमाने २१ ते २८ मे या कालावधीत हा सोहळा संपन्न होणार आहे.

२१ मे रोजी सकाळी ९ वाजता रमेशराव भिसे व हेमंतराव नाममोते यांच्या हस्ते कलश पुजन होऊन सोहळ्याचा शुभारंभ झाला. कथा प्रवक्ते संजय काकडे हे आपल्या सुमधुर वाणीतुन श्री साई कथा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची ग्रामगीता यांचे रसाळ निरुपण झाले.

कथेला संगीतमय करण्यासाठी मुख्य गायक किशोर इंगळकर, सहायक प्रल्हाद काळे, हार्मोनियम वादक प्रमोदराव कडु पाटील, तबला वादक सोपान उमाळे व सर्व संच घोराड येथील कलाकार साथसंगत केली. दररोज पहाटे ४.३० ते ६.३० वाजता सामुदायिक ध्यान व काकडा भजन, दुपारी ४ ते ७ वाजता समस्त महिला भजनी मंडळ एकदरा यांचे भजन, सायं. ७ ते ७.३० सामुदायिक प्रार्थना, रात्री ८.१५ ते १०.४५ वाजता संगीतमय श्री साई कथा व ग्रामगीता प्रवचन,२८ मे रोजी सोहळ्याचा समारोप होणार आहे.

याच दिवशी सकाळी ६.३० ते ९.३० वाजता रामधुनसह शोभायात्रा काढण्यात येईल. त्यानंतर सकाळी ११ ते दुपारी १ वाजता राष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.प.केशवराव भोंड महाराज यांचे गोपाळ काल्याचे कीर्तन, दुपारी १.३० ते ६ वाजता महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे.

# दिल्लीत तीन दिवसांचा वाहतूक संप सुरू : दरवाढीसाठी वाहतूकदार आक्रमक

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




**नवी दिल्ली** – दिल्ली सरकारच्या उपकराला आणि सीएनजीच्या वाढत्या किमतींना विरोध करण्यासाठी अनेक वाहतूक आणि टॅक्सी संघटनांनी गुरुवारी दिल्ली–एनसीआरमध्ये तीन दिवसीय संप सुरू केला. यामुळे गुरुवारी अनेक भागांत हजारो प्रवाशांना प्रवासादरम्यान मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला.

हा तीन दिवसीय संप २३ मे पर्यंत चालणार असून, प्रामुख्याने व्यावसायिक वाहनांवर पर्यावरण नुकसानभरपाई उपकर वाढवण्याच्या दिल्ली सरकारच्या निर्णयाविरोधात हा संप पुकारण्यात आला आहे. नवी दिल्ली रेल्वे स्टेशन आनंद विहार, मंडी हाऊस मेट्रो स्टेशन आणि इतर ठिकाणांसह राष्ट्रीय राजधानीतील काही अत्यंत गजबजलेल्या भागात प्रवाशांना त्रासाला सामोरे जावे लागले. या आंदोलनाचा भाग म्हणून संजय गांधी ट्रान्सपोर्ट नगरसारख्या औद्योगिक क्षेत्रांमध्ये ट्रक रस्त्याच्या कडेला उभे असलेले पाहायला मिळाले.

एका प्रवाशाने सांगितले की, 'आम्ही घरी जाण्यासाठी टॅक्सी बुक करण्याचा प्रयत्न केला, परंतु नेहमीपेक्षा जास्त वेळ वाट पाहावी लागत होती आणि स्टेशनवर ऑटो–रिक्षाही खूप कमी उपलब्ध होत्या. कॅब बुकिंगचे भाडेही खूप जास्त दाखवत होते.'

# व्हेनेझुएला लवकरच भारताचा मोठा तेल पुरवठादार होणार, अमेरिकेने दिले संकेत

(प्रतिनिधी वरूड दर्पण)




***नवी दिल्ली*** – अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ लवकरच भारत दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यापूर्वी त्यांनी केलेल्या एका मोठ्या घोषणेमुळे आंतरराष्ट्रीय राजकारण आणि ऊर्जा बाजारात खळबळ उडाली आहे. भारताला जितकी ऊर्जा हवी असेल, तितकी देण्यासाठी अमेरिका तयार आहे, असे स्पष्ट सांगत त्यांनी भारताला अमेरिकेचा महान भागीदार म्हटले. भारताच्या ऊर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी अमेरिका अधिक प्रमाणात तेल आणि एलपीजी निर्यात करू इच्छित असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. याचवेळी रुबियो यांनी आणखी पुढील आठवड्यात भारत दौऱ्यावर येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. विशेष म्हणजे या दौऱ्याबाबत भारत किंवा वेनेजुएला या दोन्ही देशांकडून अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली एक मोठा खुलासा केला. व्हेनेझुएलाचे कार्यवाहक राष्ट्रपती नव्हती. त्यामुळे अमेरिकेच्या या वक्तव्यामागे मोठे कूटनीतिक संकेत दडले असल्याची चर्चा जागतिक राजकीय वतुर्ळात सुरू झाली आहे. होर्मुझ सामुद्रधुनीतील तणावामुळे भारताने गेल्या काही महिन्यांत तेल आयात धोरणात बदल करण्यास सुरुवात केली आहे. भारत सध्या रशिया, यूएई आणि इतर खाडी देशांकडून मोठ्या प्रमाणात स्वस्त तेल खरेदी करतो.

# प्रसाद लाड तुमचा लहान भाऊ, दूत म्हणून काम करेन

## प्रसाद लाड यांचा मनोज जरांगेंना शब्द

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




***पुणे***– राज्यात पुन्हा एकदा मराठा आरक्षणाचा मुद्दा चर्चेत आला आहे. मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्यासाठी मनोज जरांगे यांनी पुन्हा उपोषणाचा इशारा देत सरकारला निर्वाणीचा इशारा दिला आहे. अशातच आज (२२ मे) भाजप नेते प्रसाद लाड हे अंतरवली येथे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची भेट घेणार आहेत. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी मनोज जरांगे यांनी दोन दिवसांपूर्वी प्रसाद लाड यांना अंतरवलीत येण्याचं आवाहन केलं होतं. दरम्यान, ३० मेपासून मनोज जरांगे पुन्हा आमरण उपोषणाला बसणार असल्याची घोषणा केली आहे. मात्र या भेटीपूर्वी धक्कादायक प्रकार समोर आला आहे. छत्रपती संभाजीनगरमधील एका हॉटेलमध्ये प्रसाद लाड थांबले असताना दोघांनी हॉटेलमध्ये शिरण्याचा प्रयत्न केला. याआधी प्रसाद लाड यांच्या पीएला धमकीचा फोनही आल्याची माहिती आहे. या प्रकरणी योगेश शितोळे पाटील आणि गणेश उगले यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. एकंदरीत या घडलेल्या प्रकारावर मनोज जरांगे आणि प्रसाद लाड या दोघांची प्रतिक्रिया आली असून प्रसाद लाड आणि मनोज जरांगे यांच्या चर्चेतील १० मोठे मुद्दे जाणून घेऊया.

# पुसल्याच्या संघर्षशील शेतकरी भगिनींचा राज्यस्तरीय 'राजीव गांधी कृषिरत्न पुरस्कारा'ने गौरव!

## कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी : बिडकर भगिनींच्या शेताच्या बांधावर जाऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**वरूड** – तालुक्यातील पुसला येथील संघर्षशील शेतकरी कन्या बेबी बिडकर आणि सुशीला बिडकर यांना २१ मे २०२६ रोजी राज्यस्तरीय 'राजीव गांधी कृषिरत्न संयुक्त पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केलेल्या 'जागतिक महिला शेतकरी वर्षा'च्या अनुषंगाने, राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठानच्या वतीने हा मानाचा पुरस्कार यावर्षी या दोन्ही भगिनींना जाहीर झाला होता.

थेट शेताच्या बांधावर सोहळा! पारंपारिक चौकटी मोडून शेतीत घवघवीत यश मिळवणाऱ्या बिडकर भगिनींना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार त्यांच्याच शेताच्या बांधावर जाऊन मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.

मान्यवरांची उपस्थिती या गौरवशाली सोहळ्याला कृषी आणि सामाजिक क्षेत्रातील दिग्गज मंडळी उपस्थित होती:

जिजामाता कृषी भूषण पुरस्कार प्राप्त महिला शेतकरी व ग्रामगीताचार्य पौर्णिमा सवाई, प्रमुख, संत गाडगेबाबा अध्यासन, अमरावती विद्यापीठ डॉ.दिलीप काळे, संस्थापक अध्यक्ष, राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठान प्रकाश साबळे, सेवानिवृत्त तालुका कृषी अधिकारी अविनाश पांडे तसेच निलेश उभाड, अनुला खान अजीज खान, आणि वैभव निमकर आदी मान्यवर उपस्थित होते.

'बिडकर भगिनींची शेती व समाज व्यवस्थेतील संघर्षगाथा संपूर्ण शेतकरी समाजासाठी अत्यंत प्रेरणादायी आणि बोध घेण्यासारखी आहे.' संस्थापक अध्यक्ष प्रकाश साबळे.

महिला सक्षमीकरणाचा नवा अध्याय ग्रामीण भागातील महिला शेतकरी केवळ मजूर नसून त्या शेती व्यवस्थापनातही अव्वल ठरू शकतात, हे बिडकर भगिनींनी दाखवून दिले आहे. महिला शेतकरी सक्षमीकरणाचा हा सन्मान ग्रामीण भागातील इतर महिलांसाठी निश्चितच नवी उमेद आणि प्रेरणा देणारा ठरेल.

# जळगावच्या जागेसाठी महायुतीत रस्सीखेच : मंत्री गुलाबराव पाटील आपल्या पुत्रासाठी आग्रही

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



***जळगाव*** – विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदारसंघाची निवडणूक जाहीर होताच जळगाव जिल्ह्यात महायुतीत राजकीय हालचालींना वेग आला असून भाजपा आणि शिवसेना शिंदे गट यांनी या जागेवर आपला दावा सांगितला आहे. या निवडणुकीसाठी भाजपच्या इच्छुक उमेदवारांनी वरिष्ठ पातळीवर तिकीट मिळवण्यासाठी गाठी भेटी घेण्यास सुरुवात केली आहे. शिवसेना शिंदे गटातून पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी आपले पुत्र प्रताप पाटील यांना निवडणूक रिंगणात उतरवण्याची तयारी केल्याने जिल्ह्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. विधान परिषदेच्या या जागेवर दोन वेळा भाजपा तर दोन वेळा शिवसेना विजयी झालेली आहे. यामुळे दोन्ही पक्षांनी या जागेवर आपला दावा सांगितला आहे. तरीही विजयी होण्यासाठी मतांचे गणित पाहता बहुमताचा आकडा हा भाजपाकडे आहे. त्यामुळे भाजपा जळगावच्या जागेसाठी ठाम आहे. या निवडणुकीसाठी ६३० मतदार असून गेल्या २० वर्षापासून ही जागा भाजपाकडे असल्याने ती जागा प्रतिष्ठेची बनली आहे. या जागेसाठी इच्छुकांनी बुधवारी मुंबईत मुख्यमंत्री व मंत्री गिरीश महाजन यांची भेट घेतली. मात्र उमेदवार देण्याबाबत अद्याप कोणताही निर्णय झाला नसल्याचे त्यांना सांगण्यात आले. २०१० मध्ये शिवसेनेकडून मनीष जैन आणि भाजपाकडून एकनाथ खडसे यांचे पुत्र निखील खडसे यात झालेली लढत ही राज्यभर गाजली होती. यात निखील खडसे यांचा १७ मतांनी पराभव झाला होता. २०१४ मध्ये भाजपाकडून गुरूमुख जगवानी हे बिनविरोध निवडून आले होते तर २०१६ मध्ये भाजाचे चंदुलाल पटेल हे विजयी झाले होते. यामुळे भाजपाने या जागेवर दावा केला असून जागा वाटपात भाजपा व शिंदे गट यात मोठी रस्सीखेच होण्याची शक्यता आहे. प्राथमिक माहिती नुसार, भाजपा विधान परिषदेच्या १२ जागा लढवणार असून त्यात जळगावची जागा आहे.

# वारकऱ्यांसंदर्भातील विधान : विकास लवांडे यांना अटक

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



***पुणे*** – वारकरी संप्रदायाबद्दल केलेल्या कथित वादग्रस्त विधानाप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) प्रवक्ते विकास लवांडे यांना गुरुवारी वाघोली पोलिसांनी अटक केली.

या कारवाईमुळे राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडाली आहे. भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्या नलिनीताई वायाळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वाघोली पोलिसांनी ही कारवाई केली आहे. मात्र, ही संपूर्ण कारवाई म्हणजे आपली मुस्कटदाबी करण्याचा आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा शासन पुरस्कृत प्रकार असल्याचा आरोप विकास लवांडे यांनी केला.

लवांडे यांनी काही दिवसांपूर्वी एका व्हिडिओमध्ये वारकरी संप्रदायामध्ये घुसखोर शिरले आहेत, असे विधान करून धार्मिक भावना दुखावल्याचा आणि समाजात धार्मिक द्वेष निर्माण केल्याचा आरोप नलिनीताई वायाळ यांनी दिलेल्या फिर्यादीमध्ये केला होता. या प्रकरणात लवांडे यांनी मिळवलेला अंतरिम जामीन न्यायालयाने २० मे २०२६ रोजी रद्द केला आणि पोलीस प्रशासनाला कारवाईचे आदेश दिले. त्यानंतर वाघोली पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन त्यांचा जबाब नोंदवण्याची प्रक्रिया सुरू केली आणि अखेर त्यांना अटक करण्यात आली.

## तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अमरावती | २९ | २४ |
| यवतमाळ | २८ | २१ |
| अकोला | २७ | २४ |
| वाशिम | २८ | २३ |
| बुलढाण | २७ | २२ |
| वर्धा | ३० | २३ |
| नागपूर | २९ | २४ |
| चंद्रपुर | २९ | २५ |
| गडचिरोली | २८ | २३ |
| नाशिक | २६ | २२ |
| पुणे | ३० | २१ |


## नोकरी

मिहान, ऑफिस, बँकींग, अर्धसरकारी प्रोजेक्ट साठी प्रत्येक जिल्हयात भरती. ऑपरेटर, सुपरवायजर, गार्ड, वर्कर, मॅनेजर

वय – १८ ते ३५

पगार – १५,००० ते ३५,००० कमवा

पुजा मॅडम ७७९६३८७१५६ ७८८८०६९४५५



## पाहिजेत

वरुड शहरातील पांढुर्णा चौक ते जायंटस चौक दरम्यान असलेल्या नामांकित हरिओम टाईल्स शोरुम करीता किमान ५ ( पाच ) सेल्समनची आवश्यकता आहे.

अनुभव असणाऱ्यास प्राधान्य

-: Qualification :-

Any Graduate Or Post Graduate

संपर्क

हरिओम टाईल्स

पांढुर्णा चौक ते जायंटस चौक, त्रिमुर्ती कॉम्प्लेक्स समोर, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

Contact No.9422155346


## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील जे.एस.ठाकरे मॅडम, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४२६/२०२६** **ने.ता.३०/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती अरुण युवराज कावनपुरे, वय अं.४६ वर्ष, धंदा–घरकाम, २) बादल युवराज कावनपुरे, वय अं.२२ वर्ष, धंदा- मजुरी, क्र.१ व २ रा.आर्वी, ता.आर्वी, जि.वर्धा, ३) निखील युवराज कावनपुरे, वय अं.२३ वर्ष, धंदा- मजुरी, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत युवराज बाबुरावजी कावनपुरे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१२/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




पुलवामा हल्ल्याचा सूत्रधार हमजा बुरहानची हत्या

# पाकव्याप्त काश्मीरमध्ये अज्ञात हल्लेखोरांनी केला अंदाधुंद गोळीबार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली/ मुझफ्फराबाद** – ४० सीआरपीएफ जवानांचा बळी घेणाऱ्या अत्यंत भीषण अशा २०१९ मधील पुलवामा दहशतवादी हल्ल्याचा मुख्य सूत्रधार आणि 'अल बद्र' या बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनेचा कमांडर हमजा बुरहान उर्फ 'डॉक्टर' याची पाकव्याप्त काश्मीरमध्ये अज्ञात



बंदूकधाऱ्यांनी गोळ्या झाडून हत्या केली आहे. पाकव्याप्त काश्मीरमधील मुझफ्फराबाद येथे हा थरार घडला असून, अनेक गोळ्या लागल्यामुळे बुरहानचा जागीच मृत्यू झाल्याचे वृत्त आहे.

मूळचा जम्मू–काश्मीरमधील पुलवामा येथील रहिवासी असलेला हम्झा बुरहान २०१७ मध्ये उच्च शिक्षणाच्या बहाण्याने पाकिस्तानात गेला होता. मात्र, तिथे गेल्यावर तो 'अल बद्र' या दहशतवादी संघटनेत सामील झाला. अल्पावधीतच त्याने आपल्या क्रूर कारवायांमुळे 'कमांडर' पदापर्यंत मजल मारली. बुरहान मूळचा पुलवामाचा रहिवासी भारत सरकारने २०२२ मध्ये बेकायदेशीर कृत्य प्रतिबंधक कायद्यांतर्गत त्याला अधिकृतपणे दहशतवादी म्हणून घोषित केले होते . तो अबू दुजाना, अबू कासिम, बुरहान वानी आणि झाकीर मुसा यांच्या जवळचा होता.

२०१९ च्या पुलवामा दहशतवादी हल्ल्याच्या सूत्रधारांपैकी तो एक मानला जात होता, ज्यामध्ये ४० जवान शहीद झाले होते.केंद्रीय गृह मंत्रालयाच्या नोंदीनुसार, २३ वर्षीय अर्जुमंद गुलजार दार उर्फ हमजा बुरहान हा मूळचा पुलवामाचा रहिवासी होता.

# मावळच्या इतिहासाचं नवं पान उजेडात



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मावळच्या ऐतिहासिक भूमीत पुन्हा एकदा इतिहासाचा गूढ ठेवा समोर आला असून विसा–पूर गडाच्या आडवाटेवर एक प्राचीन आणि अपरिचित भुयार आढळल्याने इतिहास अभ्यासकांसह दुर्गप्रेमींमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. भटकंती करताना सफर ३६१ किल्ल्यांची सामाजिक प्रतिष्ठानच्या दुर्गसेवकांना हे भुयार सापडलं असून आता या शोधामुळे मावळच्या इतिहासातील अनेक न उलगडलेले पैलू समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मावळातील विसापूर गडाच्या पायथ्यालगतच्या मालेवाडी परिसरातून दुर्गभ्रमंतीसाठी निघालेल्या दुर्गसेवकांना उभ्या कातळात कोरलेलं हे भुयार दिसून आलं.

# वीजगळती रोखण्यात महावितरणला अपयश, तब्बल ७०० ते ८०० कोटींचा फटका

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्यभरात वीजचोरी आणि तांत्रिक कारणांमुळे मोठ्या प्रमाणात वीजगळती होत असते. अशातच आता महावितरणच्या ८०० कोटींच्या वीजगळतीचा फटका थेट ग्राहकांना बसत असल्याचे चित्र आहे. दरवर्षी १,५०० ते १,७०० कोटींहून अधिकचे युनिट वीज वितरण होत असतं. त्यापैकी १५ टक्क्यांहून अधिक म्हणजेच सुमारे २५० कोटी युनिट




वीजगळती होत असते. या वीजगळतीची किंमत तब्बल ७०० ते ८०० कोटी रुपयांपर्यंत असून त्याचा भुर्दंड वीजदरवाढीच्या माध्यमातून सर्वसामान्य ग्राहकांवर बसणार आहे. महावितरणच्या म्हणण्यानुसार, एमईआरसीकडून १५ टक्क्यांहून कमी वीजगळती असावी असे निर्देश आहेत. त्या दृष्टीनेच आमचे प्रयत्न असून वीजगळती कमी करण्याचा प्रयत्न असतो. असं असलं तरी या सर्वाचा फटका आता सर्वसामान्यांच्या खिशाला बसणार असून ग्राहकांनी याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. पुढील पाच वर्षांसाठी मंजूर वीजगळती

२०२५–२६ – १७ टक्के
२०२६–२७ – १५.५ टक्के
२०२७–२८ – १४ टक्के
२०२८–२९ – १२.५ टक्के
२०२९–३० – ११ टक्के

गळतीची प्रमुख कारणे.

# ठाणे उपमहापौरांविरोधात शिस्तभंगाची कारवाई करा

## शिंदे सेनेचे नगरसेवक रेपाळे यांची मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**ठाणे** – ठाणे महापालिकेच्या महासभेत झालेल्या गोंधळावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले असून उपमहापौरांविरोधात थेट शिस्तभंग कारवाईची मागणी करण्यात आली आहे. शिंदे सेनेचे नगरसेवक विकास रेपाळे यांनी महापौरांकडे लेखी निवेदन देत उपमहापौरांनी महासभेत अध्यक्षीय अधिकारांचा अवमान करत सभागृहाचे कामकाज मुद्दाम विस्कळीत करण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप केला आहे.

१५ मे रोजी पार पडलेल्या महासभेत महापौर अध्यक्षस्थानी असतानाही उपमहापौरांनी परवानगी न घेता वारंवार हस्तक्षेप केल्याचा आरोप



निवेदनात करण्यात आला आहे. 'सभा उधळून लावू', 'सभागृह चालू देणार नाही' अशा धमकीवजा भाषेचा वापर करत लोकशाही प्रक्रियेलाच आव्हान दिल्याचे रेपाळे यांनी म्हटले आहे. महापौरांनी स्पष्ट निर्देश दिल्यानंतरही आदेशाचे पालन करण्यात आले नसल्याने हा प्रकार केवळ गोंधळ नसून अध्यक्षीय अधिकारांवर थेट हल्ला असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.उपमहापौरांसारख्या जबाबदार पदावरील व्यक्तीकडूनच सभागृह नियमांचे उल्लंघन होत असल्याने चुकीचा आणि धोकादायक पायंडा पडत असल्याची टीका निवेदनातून करण्यात आली आहे. महासभा मुद्दाम ठप्प करण्याचा प्रयत्न झाला असून हा प्रकार पूर्वनियोजित असल्याचा संशयही व्यक्त करण्यात आला आहे. रेपाळे यांनी महापौरांकडे पाच प्रमुख मागण्या करत या प्रकरणाची अधिकृत इतिवृत्तात नोंद करणे, व्हिडीओ फुटेज आणि ध्वनिमुद्रणांची चौकशी करणे, संबंधितांवर तत्काळ शिस्तभंग कारवाई करणे तसेच भविष्यात अशा प्रकारच्या वर्तनावर निलंबनासह कठोर कारवाईचा इशारा देण्याची मागणी केली आहे. महासभेतील या आरोपांमुळे महायुतीतील अंतर्गत संघर्ष पुन्हा उघड्यावर आला असून ठाणे महापालिकेतील सत्ताधाऱ्यांमध्येच संघर्ष तीव्र झाल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू झाली आहे.

# कल्याण रेल्वे स्थानक मारहाण प्रकरण : ठाकरे यांची निर्दोष मुक्तता

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**ठाणे** – १८ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या कल्याण रेल्वे स्थानक मारहाण प्रकरणात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह सहा जणांची ठाणे जिल्हा न्यायालयाने गुरुवारी निर्दोष मुक्तता केली. मुख्य न्यायिक दंडाधिकारी ए. व्ही. कुलकर्णी यांनी पुराव्याअभावी हा निकाल दिला.



२००८ मध्ये रेल्वे भरती परीक्षेदरम्यान कल्याण रेल्वे स्थानक परिसरात परराज्यातून आलेल्या उमेदवारांना मारहाण झाल्याची घटना घडली होती. त्या वेळी मनसेकडून परप्रांतीयांच्या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेतली जात होती. तसेच रेल्वे भरती प्रक्रियेत स्थानिक तरुणांवर अन्याय होत असल्याचा आरोपही मनसेने केला होता. या पार्श्वभूमीवर घडलेल्या घटनेनंतर राज ठाकरे आणि मनसेच्या काही कार्यकर्त्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.या प्रकरणातील दोन आरोपींचे दरम्यानच्या काळात निधन झाल्याने उर्वरित सहा जणांविरोधात सुनावणी सुरू होती. सुरुवातीला कल्याण न्यायालयात चालणारे हे प्रकरण नंतर ठाणे न्यायालयात वर्ग करण्यात आले. काही दिवसांपूर्वी झालेल्या सुनावणीत राज ठाकरे न्यायालयात प्रत्यक्ष हजर झाले होते. त्यांच्या उपस्थितीमुळे न्यायालय परिसरात मनसे कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती. सुनावणीदरम्यान बचाव पक्षाने संपूर्ण प्रकरण राजकीय हेतूने दाखल करण्यात आल्याचा दावा केला.

तसेच आरोपींविरोधात ठोस पुरावे नसल्याचा मुद्दा न्यायालयासमोर मांडला. बचाव पक्षाचे वकील शैलेश सडेकर, शुभम कानडे आणि सह्याजी शिंदे यांनी बाजू मांडली, तर सरकारी पक्षाकडून वकील प्रमिला चव्हाण यांनी युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने पुरावे अपुरे असल्याचे निरीक्षण नोंदवत सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली.




